**Publication :** Shivner

**Region :** Mumbai

**Date :** Dec 08, 2010

# शिक्षणात प्रगतीशील बदल आणण्याकरता आयोजित स्कूल ऑफ टुमॉरोची यशस्वी सांगता

मुंबई, मंगळवार : आयडिस्कव्हरी ने स्कूल ऑफ टुमॉरोच्या दुसऱ्या पर्वाची सुरुवात करत असताना आधुनिक शिक्षणासंबंधी एक्सिड या वार्षिक आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञांनी केलेल्या उच्च दर्जाच्या आणि उत्तेजनपर भाषणांमधून शालेय शिक्षणात प्रगतीशील बदल होण्याचा मार्ग सापडू शकेल. एकाच वेळी नवी दिल्ली, मुंबई, हैद्राबाद आणि चेन्नई येथे आयोजित करण्यात आलेल्या स्कूल ऑफ टुमॉरो च्या माध्यमातून भारतीय उपखंडात शालेय शिक्षणाबाबत वैचारिक नेतृत्व निर्माण व्हावे याकरता प्रयत्न करण्यात आला. इंटरनेट आणि व्हिडिओकॉन्फरन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करून चारही शहरांमध्ये हा कार्यक्रम एकसंधपणे राबवण्यात आला.

एमआयटी स्लोअन स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे प्रो. पीटर सेन्ज, शिकवणे आणि शिकणे यासंदर्भातील जगभरातील प्रख्यात संशोधकांपैकी एक हार्वर्ड युनिव्हर्सिटीचे प्रा. डेव्हीड पार्किन्स आणि नामवंत लेखक आणि प्रॉक्टर अँड गॅम्बल इंडियाचे माजी सीईओ गुरुचरण दास यांनी उत्तेजनपर मार्गदर्शन केले जे एकाच वेळी चारही केंद्रांवर प्रसारीत झाले. शिक्षण, कॉर्पोरेट आणि व्यवसाय या क्षेत्रातील ५० हून अधिक नामवंत व्यक्तींनी या मोठ्या शैक्षणिक कार्यक्रमात भाग घेतला.

आपल्या संदेशात डॉ. अब्दुल कलाम यांनी भारताला जर सुपरपॉवर बनायचे असेल तर कशाप्रकारच्या नागरिकांची गरज आहे याविषयी अपेक्षा व्यक्त केल्या तसेच मूल्ये, कौशल्य आणि दृष्टिकोन यांची जोपासना आपणी वर्धीत करण्यासाठी काम करण्याची गरज आहे ते सांगितले.

हार्वर्ड ग्रॅज्युएट स्कूल ऑफ एज्युकेशनमधील वरिष्ठ प्राध्यापक आणि प्रोजेक्ट झिरो या संशोधन कार्यक्रमाचे सहसंस्थापक प्रा डेव्हीड पार्किन्स यांनी भविष्यातील परिणामकारक शाळा कशा असतील याविषयी आपले विचार स्पष्ट केले आणि या संधींचा लाभ घेण्यासाठी आज काय करता येईल याविषयी चर्चा केली.

हार्वर्ड युनिव्हर्सिटीचे प्राध्यापक डेव्हीड पार्किन्स म्हणाले, "शिक्षणतज्ज्ञ म्हणून आम्ही सर्वजण जाणतो की शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात किती खोलवर फरक पडू शकतो आणि एखाद्या विद्यार्थ्याला बालवाडी-पासून ते पदव्युत्तर शिक्षण देण्याने काय बदल होतो. पारंपारीक शिक्षणात आपण केवळ ज्ञात गोष्टींविषयी माहिती करून घेत होतो. पण आजच्या शिक्षणात आपल्याला एकविसाव्या शतकात राहण्याकरता आवश्यक विचारप्रक्रिया, दृष्टिकोन तसेच संवाद याची गरज भासते. येथे आम्ही केवळ ज्ञातच नाही तर अज्ञात गोष्टींसंदर्भातील संधी आणि आव्हानांचा सामना करतो."